नवाकाळ शब्दकोडे-८९



आडवे शब्द – १. देव, ईश्वर ५. आरंभीचा, पहिला ६. वरून खवले असलेले आंबटगोड फळ ९. पेरणीच्या आधी जमीन भुसभुशीत करून घेणे १०. पितृपंधरवडा ११. नेहमी १२. शुभ, पवित्र १४. भांडकुदळ स्त्री १५. एखाद्याच्या पूर्ण अंकित झालेला १८. आर्थिक व्यवहार १९. श्वेत, शुभ्र २१. युद्धबंदी २२. बोध, उकल २४. तडफ, उत्साह २५. अधोगती २७. चळत, चवड २९. उपवासाचा एक पदार्थ ३१. घोड्याचे पाऊल, हिंमत, बिशाद ३२. बिचारा, पामर ३३. पारंगत, निपुण ३५. बलरामाची बायको, सत्ताविसावे नक्षत्र ३६. शेखी, प्रौढी ३७. मातीच्या भांड्याचा तुटलेला तुकडा ३८. निखारा ३९. शपथ ४०. शोध ४२. आक्षेप, विरोध ४४. स्वादिष्ट, चविष्ट ४८. पक्षी ४९. समुद्राच्या लाटांचा आवाज ५१. उषःकाल, सूर्योदयाच्या आधीची वेळ ५२. डोंगराचा तुटलेला भाग ५३. चारी बाजूंना ५४. ओलिताखालील शेती, नगदी पिकांची शेती ५६. लाल व गोड गर असलेले थंड फळ ५९. पसरणे, विस्तारणे ६०. प्रखर, उग्र ६२. खालचा भाग, बुडखा ६३. कलश, छोटा तांब्या ६५. माळ ६७. जास्वंद ६९. सैल डगला ७०. निधन होणे ७१. फोलपट ७४. कृतक, वरवरचा (राग) ७७. निकट, समीप ८०. वर्षाव, भडिमार ८१. स्थिती, अवस्था ८३. ओझे, धान्य खरेदी करताना मोजायचे परिमाण ८४. भावंडे ८६. बारा वर्षे ८८. लहानसहान तपशील ९०. आईचे वडील ९२. पराक्रमी, शूर व्यक्ती ९३. भेग, चीर ९४. आयुर्वेदिक औषधांचा एक प्रकार ९५. वस्तू, जिन्नस ९६. शासकीय ९९. आठवड्याचा अंश १००. शिल्लक १०१. आग्राची प्रसिद्ध वास्तू १०२. सत्त्व, परीक्षा १०३. दयामाया १०५. जाणे, गमन १०६. धष्टपुष्ट १०७. राहण्याचे ठिकाण

उभे शब्द –

१. ऐश्वर्य, विश्व २. जरुरी ३. दुकानदार, बोलणे ४. जास्त किंमतीचे ५. प्रयत्नांवाचून लाभलेला ६. कोर्ट, न्यायालय ७. समजूतदार ८. थाट, तोरा ९. नवविवाहितांना दिला जाणारा आशीर्वाद १०. बिशाद ११. मित्र १३. उष्ण, कढत १४. अतिशय कंजूष १६. ही एका हाताने वाजत नाही १७. आनन, मुद्रा, वदन १९. पुस्तकातला पाठ, अहल, शिक्षा २०. ऊन २३. यकृताचा मोठा आजार २४. भूमी, जमीन २५. कुशल, पटू २६. झाल्या चुकीबद्दल वाटणारा खेद, पश्चात्ताप २८. विस्तारपूर्वक, तपशीलवार ३०. सर्दीपडसे होते तेव्हा चहा बनवताना घालण्याची पात ३२. जन्मदाता, जनक ३४. वाघसिंहाचा बछडा ३७. विशेष ३८. पक्षी, आकाशात विहार करणारा ३९. बोजा, ओझे ४१. लुच्चा ४३. शेतीसाठी दिलेले तात्पुरते कर्ज ४४. सुंदर स्त्री ४५. खडे सैन्य, ओरिसातले मोठे शहर ४६. तक्रार ४७. खूप, पुष्कळ ४८. एखाद्यावर सतत टीका करणे ५०. संभाळ, जपणूक, जोपासना ५२. पाषाण ५४. भोट, खुळा ५५. गायन, गीत ५७. सरबताचे आंबट फळ ५८. विहीर ६१. गोकुळ, कृष्णाचे बालपण या गावात गेले ६३. आवश्यकता, जरूरी ६४. तुफान ६५. त्वरित, ताबडतोब ६६. आर्थिक घोटाळा, फ्रॉड ६८. सरपटणारा किळसवाणा प्राणी ७२. विष्णूची पत्नी, संपत्ती ७३. डिंक ७५. पृष्ठभागाचा लहानसा तुकडा ७६. अंधारात चमकणारा कीटक ७८. अफवा, कंडी ७९. मोठा पगडा असलेले, परिणामकारक ८२. कौतुक, स्तुती ८४. हंगाम, फुलून येणे ८५. छाती ८७. मांडी ८९. आवाज ९०. जायदाद, इस्टेट ९१. सल्ला ९४. हेळसांड ९५. उन्मत्त, घमेंड ९७. टेंभा, मशाल, दिवटी ९८. अस्वल ९९. काकपक्षी १०१. ओढ, कधी कधी मनावरही येणारा १०३. रानटी रेडा १०४. न बोलण्याचे व्रत •

नवाकाळ कोडे क्रमांक ८८ चे उत्तर

आडवे शब्द : १. टोक ३. लोह ४. अग्नी ६. रड्डा ७. नाव ८. पर्णकुटी १०. प्रभा ११. अनुरक्त १३. नीर १५. धाव १६. प्रस्तावना १८. शास्ता २०. दशमी २२. तरतमभाव २४. खडूस २५. केवडा २६. हाव २७. दिवा २८. नववधू ३०. खुराडे ३२. फोल ३३. जन ३५. चळत ३६. खेप ३७. चाड ३८. वैमानिक ४०. उसासा ४३. शालक ४५. उष्णोदक ४६. कांगारू ४८. वसा ५०. सीता ५२. वरई ५३. डफ ५५. ओकारी ५६. जेवण ५८. नवीन ६०. सवडीनुसार ६३. खापर ६४. कणव ६५. रायगड ६६. कड ६८. कणा ६९. साफ ७०. समंध ७२. वासा ७३. पौष ७५. नीरा ७७. दामटी ७९. पवनपुत्र ८१. सुधारस ८२. काया ८६. अनीन ८८. त्रागा ९०. अटकाव ९१. श्वापद ९३. घबाड ९५. क्रय ९७. वकील ९९. धुडकावणे १००. शोध १०१. रकमाला १०३. मेजवानी १०५. दादा १०७. चाप १०८. काटकसर १०९. अलविदा

उभे शब्द : १. टोप २. कर्णधार ३. लोटी ४. अभाव ५. अनुशासन ६. रक्त ७. नारद ९. कुवत १०. प्रस्ताव १२. रस्ता १४. नामी १६. प्रभाव १७. नाखवा १९. अवधूत २१. शर्करा २२. तट्टाणी २३. महाल २५. केवळ २७. दिन २९. वचक ३०. खुलासा ३१. डेरा ३२. फोपशा ३३. जड ३४. प्रमाद ३७. चाकर ३८. वैष्णोदेवी ३९. निकड ४०. उरू ४१. सावकार ४२. मसी ४४. लवण ४७. गारुडी ४९. सारी ५१. ताजेपणा ५४. फसगत ५५. ओसाड ५७. वर ५८. नवस ५९. नराधम ६१. वड ६२. नुकसान ६३. खाक ६४. कफनी ६७. रोष ७१. मंदाकिनी ७२. वावर ७३. पौत्र ७४. अरविंद ७६. राजी ७८. टीका ८०. पुचाट ८३. यात्रा ८४. एवढे ८५. उघड ८६. अडवणूक ८७. नक्र ८९. गाव ९०. अलकनंदा ९२. परज ९४. बाका ९६. यशोदा ९८. कीर ९९. धुनी १०२. लाचार १०३. मेट्रो १०४. वाकी १०५. दार १०६. पैल

शिवसेना खासदार संजय राऊतांनी तीन भाजपा नेत्यांवर बाण सोडला

» पान १ वरून

करू. मी त्यांना सांगितले की, तुम्ही सरकार पाडण्याचा प्रयत्न केला तर ठिणगी पडेल. तेव्हा ते म्हणाले की, आम्ही केंद्रीय यंत्रणा आणू.

'झुकेंगे नही'चे टी शर्ट शिवसैनिकांनी घातले

खासदार संजय राऊत यांच्या पत्रकार परिषदेसाठी नाशिकसह महाराष्ट्रातील विविध भागातून हजारोंच्या संख्येने शिवसैनिक जमा झाले होते. शिवसेना भवनाच्या समोरचा रस्ता संपूर्ण शिवसैनिकांनी खचाखच भरून गेला होता. शिवसैनिक आक्रमक पवित्र्यात दिसत होते. 'आवाज कोणाचा शिवसेनेचा', 'शिवसेना झिंदाबाद', च्या जोरदार घोषणाबाजी शिवसैनिक देत होते. महिला शिवसैनिकही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. भाजपला थेट आव्हान महिला शिवसैनिक देत होत्या. त्यांच्यामध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत होत्या. आम्ही केवळ आदेशाची वाट पाहत आहोत. जे आदेश आम्हाला मिळतील तसे आम्ही करू अशा संतप्त भावना त्यांनी व्यक्त केल्या. महापौर किशोरी पेडणेकर याही सेनाभवनवर दाखल झाल्या होत्या. भाजपाचे जे बोलघेवडे नेते आहेत, त्यांच्याविरोधात आम्ही आहोत. अजूनपर्यंत आम्ही सुसंस्कृतपणा दाखवला, मात्र आता आम्ही गप्प बसणार नाही, असे महापौर किशोरी पेडणेकर म्हणाल्या. अनेक शिवसैनिकांनी 'झुकेंगे नही' असे लिहिलेले काळे टी शर्ट घातले होते. तर दादर मध्ये ठिकठिकाणी 'झुकेंगे नही' चे पोस्टरही लावण्यात आले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे फोटो असलेलेही पोस्टर शिवसेना भवन भागात लावले होते. सेनाभवन परिसरात पोलीस बंदोबस्तातही वाढ करण्यात आली होती.

ते माझ्यावर धाडी टाकतात. पहाटे ३ वाजता, ४ वाजता धाडी टाकता? त्याआधी मुलुंडचा दलाल पत्रकार परिषदा घेतो. हा काय प्रकार आहे? पण शिवसेना झुकणार नाही. त्यांनी मला अडकविण्याचा प्रयत्न केला, मुलांना फोन करतात की उद्या सकाळी ईडी येईल तुमच्या वडिलांना अटक होईल. या एकाही आरोपात तथ्य नाही. आता आम्ही सत्य मांडणार आहोत. आम्ही बघणार आहोत की तुम्ही राहता की आम्ही राहतो. भाजपाने हे निर्लज्ज राजकारण सुरू केले आहे.

ठाकरे कुटुंबांनी १९ बंगले कोसाई गावात बांधले आहेत असे तो भडवा म्हणतो. माझे त्या दलालाला आव्हान आहे की, ते बंगले दिसले तर मी राजकारण सोडेन आणि दिसले नाही तर त्या दलालाला अख्खी शिवसेना जोडे मारेल. खोटे बोलायचे, भ्रम निर्माण करायचा. याच किरीट सोमय्याने मराठी भाषा शाळेत असू नये म्हणून कोर्टात अर्ज केला होता. दुसरा म्हणतो आहे की, आमच्या श्रीधर पाटणकरांनी देवस्थानाची जमीन विकत घेतली. आम्ही आव्हान करतो, की हे दाखवा. या व्यवहारात १२ जणांचा व्यवहार आहे आणि शेवटच्या माणसाकडून पाटणकर यांनी जमीन विकत घेतली आहे. अडसूळ, गवळी, परब अशा सर्वांवर खोटे आरोप केले. मग माझ्या मागे लागले. मी कधीच चुकीचे काम केले नाही. आजच सकाळी ईडीचे लोक माझ्या बँकेत गेले आणि वीस वर्षांचा स्टेटमेंट घेऊन गेले. अलिबाग मधील माझ्या ५० गुंठे जमिनीचा ईडी शोध घेत आहे. त्या ठिकाणच्या लोकांना डांबून ठेवतात. धमक्या देतात, तिहारच्या जेलमध्ये टाकू म्हणतात. ही कोणती पद्धत आहे? आमच्या मुलीच्या लग्नातील फुलवाले, पताकावाले, मेकअपवाले, मेहंदीवाले यांच्याकडे ईडी चौकशी करते. मुलुंडचा माझा टेलर आहे त्याच्याकडेही गेले होते. भाजपाच्या वनमंत्र्यांच्या मुलीचे लग्न झाले तेव्हा वनाचा देखावा वाटावा म्हणून ९ कोटीचे कार्पेट घातले होते. पण आम्ही काही बोललो नाही. घरच्यांपर्यंत आम्ही जात नाही.

हरियाणात एक दुधवाला आहे एस. नरवर. मला विचारायचे आहे की, नरवर पाच वर्षांत सात हजार कोटीचा मालक कसा बनला? महाराष्ट्रात भाजपाचे सरकार आल्यावर तो इकडे यायला लागला. त्याची संपत्ती वाढू लागली. भाजपा मुख्यमंत्र्यांच्या घरी तो ये-जा करतो. सात हजार कोटीपैकी साडेतीन हजार कोटी गेल्या भाजपा सरकारवेळी महाराष्ट्रातून गेले. महा आयटीत अमोल काळे, उदय ढवंगाळे कोण आहेत? सर्वांचे पैशाचे व्यवहार, विना टेंडर कुणाला कंत्राट मिळाले. पाच हजार कोटीचा गैरव्यवहाराचा हिशेब माझ्याकडे आला आहे. ही सर्व माहिती ईडीकडे जाणार आहे. पत्राचाळ आणि पीएमसी बँक घोटाळ्यात त्यांनी शिवसेनेचा संबंध लावला. माझे मित्र आहेत म्हणून त्यांना अडकविले. हा भडवा वारंवार सांगतो की, आम्ही या घोटाळ्यातील पैसे वापरत आहोत. राकेश वाधवानला सर्वच ओळखत होते. त्याने भाजपाला २० कोटी दिले आहेत. ईडी, इओडब्ल्यू, सीबीआय, पंतप्रधान, गृहमंत्री आज ही पत्रकार परिषद ऐकत आहेत. सोमय्या म्हणतो की, राकेश वाधवान भयंकर आहे, घोटाळेबाज आहे. मग निकॉन इन्फ्रा कंपनी कुणाची आहे? ती किरीट सोमय्या कुटुंबाची आहे. यात वाधवान आणि सोमय्या पार्टनर आहेत. मौजे गोखिरे ता.वसई येथे त्यांनी प्रकल्प उभारला. त्याने वाधवानला ब्लॅकमेल करून देवेंद्र नथानी मार्फत जमीन घेतली. रोख कोट्यवधी रुपये घेतले. ४०० कोटीची जमीन ४० कोटीला घेतली. त्या जमिनीवर जी कंपनी आहे त्यावर नील सोमय्या हजारो कोटीचे प्रकल्प उभारत आहे. पर्यावरण परवानगी नाही. हा प्रकल्प रद्द करा, असे मी आदित्य ठाकरेंना सांगतो. ईडीला चौकशी करायला सांगतो, यात पत्राचाळ आणि पीएमसी बँक घोटाळ्यातील पैसा आहे. पीएमसी बँक घोटाळ्यातील तपास ईडी करते आहे. सोमय्याचा घोटाळ्याची सर्व कागदपत्रे मी गेल्या तीन महिन्यांत तीनवेळा पाठविली. पण सोमय्या ईडी कार्यालयात बसून दही, खिचडी खातो. हे सर्व ईडीचे दलाल आहेत. जितेंद्र चंद्रलाल नवलानी कोण आहे? हे नाव ऐकून दिल्लीतील आणि राज्यातील ईडीचा श्वास बंद होतो. गेले चार महिने मुंबईतील ७० प्रतिष्ठीत बिल्डरांकडून ईडीची धमकी देऊन वसुली सुरू आहे. फरीद शमा, रोमी, शमा, नवलानी यांनी ३०० कोटी ईडीसाठी वसुली केली. हे ईडीचे अधिकारी कुठे अय्याशी करतात ते मी सांगणार आहे. पंतप्रधान आणीबाणीविरुद्ध जोरात भाषण करतात. मग ही लोकशाही आहे. माझ्या निकटवर्तीयांवर धाडी टाकल्या तेव्हा मी अमित शहांना फोन केला की, मला त्रास द्या. माझ्या मित्रांना, मुलांना, निकटवर्तीयांना का छळता? हा महाराष्ट्र आहे. आम्ही झुकणार नाही. हे ट्रेलर आहे. पुढील पत्रकार परिषदेत मी व्हिडीओ, फोटो दाखविणार आहे. काहीजण दिल्लीत गेले आहेत. त्यांना जाऊ दे. दरम्यान, आज पत्रकार परिषदेत संजय राऊत यांच्याबरोबर अनिल देसाई, आदेश बांदेकर, मनिषा कायंदे, दिवाकर रावते, विनोद घोसाळकर, किशोरी पेडणेकर, अरविंद सावंत, सचिन अहिर, राहुल शेवाळे आदी उपस्थित होते.

शिवसेना भवनाच्या बाहेर मोठा स्क्रीन आणि स्टेज

शिवसेना भवनाच्या बाहेर पत्रकार परिषद पाहण्यासाठी मोठा स्क्रीन तसेच स्टेज उभारण्यात आला होता. शिवसेना भवन येथे वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून वेगळ्या रस्त्याचा वापर करण्याचे आवाहन करण्यात येत होते. शिवसेना खासदार विनायक राऊत यांनी शिवसेना भवनाखाली पत्रकारांशी बोलताना सांगितले की, हे शिवसैनिक उस्फुर्तपणे इथे जमा झाले आहेत. महाविकास आघाडीला ज्या पद्धतीने टार्गेट केले जाते त्यामुळे शिवसैनिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. कोविड काळात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी चांगल्या रितीने परिस्थिती हाताळली. देशात त्यांचे नावलौकिक झाले. मात्र काही जणांना ते पहावत नाही.

खवोदा पहाड आणि निकला चुहे - मुनगंटीवार

संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांवर बोलताना भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, खवोदा पहाड आणि निकला चुहे का छोटासा फोटो.. डॉक्टरपेक्षा कम्पाऊंडर मोठा हरामखोर पेक्षा नॉटी मोठा, असा राऊतांचा रिसर्च आहे. त्यांनी या अगोदरच त्या कार्पेटची चौकशी केलेली आहे. त्याचा अहवाल सरकारकडे आहे. असा कुणी कार्पेट टाकते, आपल्यावर आरोप झाले, म्हणून खवोटं रेटून बोलणं हे काही योग्य नाही. आम्ही अशा पत्रकार परिषद घेऊन आरोपाला आरोप कधी केलेले नाही. तसेच माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी ९ लक्ष रुपये सांगितले. आकडा तेवढा तुम्ही दुरुस्त करुन घ्या, असेही मुनगंटीवार म्हणाले.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **सौ. प्रतिभा नंदकुमार कारंडे आणि श्री. नंदकुमार हेमंत कारंडे** याखालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मालमत्ता इच्छुक विक्रेते, श्री. विघ्नेश शंकर कवाडे आणि सौ. मंजू विघ्नेश कवाडे यांच्याकडून खरेदी करू इच्छितात.

इच्छुक विक्रेत्यांनी असे सांगितले आहे की, त्यांचे शीर्षक करारपत्र म्हणजेच दि. २९.०१.२०१३ रोजीचे विक्री करारपत्र नोंदणीकरण क्र. पीव्हीएल/०२/७४३/२०१३ दिनांक २९.०१.२०१३ त्यांच्या ताब्यातून दि १० ०१ २०२२ रोजी हरवले आहे, ज्याकरिता इच्छुक विक्रेत्यांनी, खारघर पोलीस स्थानक येथे दि २४.०१.२०२२ रोजी पोलीस तक्रार दाखल केली आहे आणि संबंधित पोलीस स्थानकाद्वारे नोंदणीकरण क्र. ०१७९/२०२२ नुसार गहाळ तक्रार नोंदविली आहे. असे की, इच्छुक विक्रेत्यांना त्यानंतर मूळ शीर्षक करारपत्र सापडले आणि ते त्यांच्या ताब्यात आहे.

सर्वसाधारण जनतेस कळविण्यात येते की, वरील चर्चिलेले मूळ शीर्षक करारपत्र हरवले होते आणि आता ते सापडले आहे.

कोणा व्यक्तीचा खालील अनुसूचित मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये किंवा त्यावर, वारसा, हिस्सा, विक्री, गहाणवट, भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, भेट, ताबा किंवा बोजा कशाही प्रकारे किंवा अन्य कोणत्याही मार्गे कोणताही दावा किंवा हक्क असल्यास किंवा वकील करारपत्र त्यांच्याकडे असल्यास, त्यांनी निम्नस्वाक्षरीकार यांना खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात, विशेषतः अशा दाव्याचे, जर असल्यास, स्वरूप नमूद करून, कागदपत्री पुराव्यासह सदर सूचनेच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत सूचित करावे. असे न केल्यास अनुसूचित मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये किंवा वर असलेला असा कोणताही दावा समर्पित केली, सोडून दिली आणि गुंडाळून ठेवली असे समजण्यात येईल.

अनुसूचित मालमत्ता

पनवेल नगरपरिषदेच्या हद्दीमधील प्लॉट क्र. २६४, २६५ आणि २६६, सेक्टर १० गाव: खारघर, तालुका पनवेल आणि जिल्हा रायगड धारण केलेल्या जमिनीवर वसलेल्या खारघर, पनवेल येथे स्थित "केसर एक्सोटिका सीएचएसएल" या इमारतीमधील दहाव्या मजल्यावरील सदनिका क्र. १००२ मोजमाप ८६० चौ. फू. (बिल्टअप क्षेत्रफळ) व त्यासह तळघर मजल्यामधील कार पार्किंग क्र. १०२.

ठिकाण: पनवेल,
दिनांक: १६.०२.२०२२

सही/-
मे. साई कन्सल्टन्सी सर्व्हिसेस
वकील उच्च न्यायालय. मुंबई
चेंबर क्र. २०१, २ रा मजला, जास्मिन गार्डन सीएचएसएल, जांभळी नाका,
हॉटेल टाईम्स स्क्वेअरजवळ, ठाणे प-४००६०१. मोबा. ९८२१००६३८४/९१६७६७५३२८/२९

जाहीर सूचना

श्री. रविंद्रनाथ कौल उर्फ मणी कौला, पिकनिक अपार्टमेन्ट को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पत्ता - जय प्रकाश रोड, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०६१ चे सदस्य आणि संस्थेच्या इमारतीमधील सदनिका/घर क्र. बी-३६ चे धारक कोणतेही नामनिर्देशन न करता, दि. ०६.०७.२०११ रोजी मरण पावले.

संस्था याद्वारे वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदारांकडून/ आक्षेपदार किंवा आक्षेपदारांकडून संस्थेच्या भांडवल/ मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचा सदर हिस्सा आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास सदर सूचना प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याच्या भाग आणि हितसंबंधांच्या हस्तांतरणास असलेल्या त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्यांच्या समर्थनार्थ अशी कागदपत्रे आणि इतर पुराव्यांच्या प्रतिंसह दावे किंवा आक्षेप मागवित आहे. वरील विहीत कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्थेच्या भांडवल/ मालमत्तेमधील दिवंगत सदस्याच्या भाग आणि हितसंबंधांसह संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास संस्था मुक्त असेल. संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याच्या भाग आणि हितसंबंधांच्या हस्तांतरणाकरिता संस्थेस जर कोणतेही दावे / आक्षेप प्राप्त झाल्यास, संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने त्याबाबत व्यवहार केला जाईल. संस्थेच्या नोंदणीकृत उप-विधींची प्रत दावेदार/रांना, आक्षेपदारांना पाहणीकरिता संस्थेच्या कार्यालयात/संस्थेच्या सचिवांकडे सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून तिच्या कालावधी समाप्तीपर्यंत स. ११.०० ते सायं. ४.०० या वेळेत उपलब्ध असेल.

दि पिकनिक अपार्टमेन्ट को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. करिता आणि त्यांच्या वतीने
मान. सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: १६.०२.२०२२

रामेश्वर मिहीवा

कामगारांसाठी जाहीर सुचना/नोटीस

या जाहीरातीव्दारे कळविण्यात येते की, **श्री. जयेश बी. भन्साली, संचालक, मे. भन्साली इंटरनॅशनल प्रा. लि., सीटीएस नं. ६९६, अे-५, भन्साली हाऊस, वीरा देसाई रोड, अंधेरी, पश्चिम, मुंबई-४०० ०५३.** या जागेचे क्षेत्रफळ १५५६.२० **चौ.मी.** तत्सम अंधेरी नगर भूमापन कार्यालय, या मिळकतीचे मालक आहोत व तिचा विद्यमान वापर बदलवून सदर मिळकत विकसित व विक्री करण्याचे आम्ही प्रस्तावित करित आहोत.

सदर भुखंडाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, के (पश्चिम) प्रभागाच्या नोंदणीनुसार सदर मिळकतीवर सद्यस्थितीत कुठलाच कारखाना/उद्योग अस्तित्वात नव्हता असे लेखी पत्र दि.१०.०२.२०२२ रोजी मुंबई महानगरपालिकेने सदर आस्थापनेला सादर केले आहे.

तरी देखील मे. भन्साली इंटरनॅशनल प्रा. लि. च्या सदर मिळकतीसंबंधी या आस्थापनेत पुर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासकाच्या विरुध्द असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्राच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त मुंबई उपनगर (पश्चिम) यांचे कार्यालय, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पुर्व), मुंबई-४०० ०५१ यांच्याकडे जाहीर नोटीस/सुचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन १५ दिवसांच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

स्थळ - मुंबई
दिनांक - १६-२-२०२२

सही/-
मे. भन्साली इंटरनॅशनल प्रा लि..
(संचालक) BYP

MAHAVITARAN — TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Sr. No.	(Tender No)/ Estimated Amt./ Tender form fee/ EMD Amt. / Name of work	Sale period of Tender ONLINE ONLY	Submission due date ONLINE ONLY
1	(SE/KC-II/HR/OS/2022/T-05A)/Limited to Rs. 2,41,22,184/- Rs. 5,900/- Rs. 1,20,611/- Providing Outsourced Skilled & Unskilled Manpower under Ulhasnagar Division-I, Kalyan Testing Dn.-II & Kalyan Circle-II Office.	From Dt. 16.02.2022 to 23.02.2022	Dt. 23.02.2022 to 15.00 Hrs.

Tenders are invited from eligible bidders for following works by **E-tendering method**
The bidders are requested to get registered for e-tendering procedure.
Contact Person- Executive Engineer (Adm.), Kalyan circle -II
Tel No. 0251-2328283-Ext No. 302, Mob: EE(Adm) 8879626969
Add: M.S.E.D.C.Ltd., Kalyan Circle-II (O&M), Tejshree Build., Third Floor, Kalyan (W) - 421301 **Email-** sekalyan2@gmail.com **Website -** www.mahadiscom.in

SBI — भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

सूचना

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतुंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असलाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली – ११००५५ (इमेल आयडी: **sbi.igr@alankit.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

भारतीय स्टेट बँक

अनु क्र.	फोलियो क्र.	धारकाचे नाव	समभाग संख्या	प्रमाणपत्र क्रमांक पासून	प्रमाणपत्र क्रमांक पर्यंत	विभिन्न क्रमांक पासून	विभिन्न क्रमांक पर्यंत
१	००८२३१३२	श्री लालसाब्मलियाना	५३०	७१९६४	७१९६५	७३९०७४३६८१	७३९०७४४२१०
२	०७३०७१५६	राधा सी एस	११०	६१०७१६९	६१०७१६९	७९८३४९२२९४	७९८३४९२४०३
३	०१४९८७२५	मुक्ताबाई दादा सावंत दादा दाजी सावंत आनंद दादा सावंत	१००	२४२३०	२४२३०	७३७८४७७०५१	७३७८४७७०८५०
४	०७४०१७२९	कावेरी अप्पनेरवंदा	४४०	६२०२४६८	६२०२४६८	८००९५७३३०८	८००९५७३७४७
५	००७४४५४८	के पद्माजा बी एस नारायणन	१९०	४२११२	४२११३	७३८३५०४७७१	७३८३५०४७९०
६	०३१६४६४६	मेघाबिनी भास्कर अहिकार	१००	२१५०८६	२१५०८६	७४५४९९१५७१	७४५४९९२०७०
७	००७९५१५७	अखिल कुमार खरे	६००	५९८२८	५९८२८	७३८७६४५०६१	७३८७६४५६६०
८	०७१२७१३५	अखिल कुमार खरे	४००	२३८७०५	२३८७०५	७४६४६९५७६१	७४६४६९६१६०
९	००८५२५४६	पूरण चंद बसंती देवी	३०	८२९८१	८२९८१	७३९३६०५०५१	७३९३६०५०८०
१०	०७१०५८१२	ई जॉय एलिजाबेथ मनुहारी	४००	२२९३९७	२२९३९७	७४६०६३२२०१	७४६०६३२९००
११	०२६०९१३५	राम कुमार गुप्ता	५००	२०३८७८	२०३८७८	७४४९३३४५४१	७४४९३३५०४०
१२	००८२९०२१	बी आर इंदुमथि	३०	७४५९७	७४५९७	७३९१४६३२६१	७३९१४६३२९०
१३	०७४२५७१३	वेंकटेश मूर्ति टी एस	११०	६२२५८२९	६२२५८२९	८०१६०७२४२५	८०१६०७२५३४
१४	००९०८०७८	भगवंत जंबागी	१२७०	१०२५६५	१०२५६६	७३९८२५८०२१	७३९८२५९२९०
१५	०७१०५३१८	कदम अशोक बालकृष्णा	२००	२२९१११	२२९१११	७४६०५१८०२१	७४६०५१८२२०
१६	०७५१५१८५	संतोष के.आर. दीक्षित	१४०	६३९६०२७	६३९६०२७	८०६१३५१८७३	८०६१३५२०१२
१७	०७१३००८४	सीताराम भट अनंतः रेवती सत्य नारायण राव उदय कुमार	४००	२४०१३४	२४०१३४	७४६५३१६०४१	७४६५३१६४४०
१८	०१८८६४१९	करिपा नंद झा	५००	१६०९८८	१६०९८८	७४२७२५५७३१	७४२७२५६२३०
१९	०३१२९९४२	एस यशोधा	६३०	२१३९३१	२१३९३२	७४५४४५८५११	७४५४४५९१४०

वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.

स्थळ: मुंबई
दिनांक: १६.०२.२०२२

समभागांची संख्या: ७०८०
स.प्रमाणपत्रांची संख्या: २३

महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)